MHST090000222012

## नि.दि.दा.क्र. ९/२०१२ मधील नि.क्र.११८ वरील आदेश

प्रतिवादी क्र.२२, २३ व २४ यांनी सदरचा अर्ज त्यांच्या विरुद्ध झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्द होवून त्यांना उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व नि.क्र.१२० ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा हा वाटप, पृथक कब्जा व दरम्यानचे उत्पन्नाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादींना वादीतर्फे मुखत्याराचा उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना वादीतर्फे मुखत्याराचा उलटतपास घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना वादीतर्फे मुखत्याराचा उलटतपास घेण्याची संधी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. वादीने पुरावा दिनांक ०४/०४/२०२२ रोजी दिला आहे. वादीचा उलटतपास नाहीचा आदेश दिनांक

१९/१२/२०२२ रोजी झालेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०२/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्यास ब–याच कालावधीचा विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण हे १२ वर्षांहून जुने आहे. इतक्या जुन्या प्रकरणामध्ये प्रतिवादीची ही वर्तणूक योग्य नाही. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी क्र.२२, २३ व २४ यांनी पुढील तारखेपर्यंत रुपये १५००/- जमा करावेत. त्यापैकी रक्कम रुपये ७५०/- वादीला दयावेत व उर्वरित रक्कम शासनास जमा करण्यात यावी.

३. वर नमूद खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी क्र.२२, २३ व २४ यांचे विरुद्ध झालेला वादीतर्फे मुखत्यार यांचा उलटतपास नाही हा आदेश रद्द करण्यात येवून त्यांना वादीतर्फे मुखत्याराचा उलटतपास घेणेची परवानगी देण्यात येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.01.18 17:29:21 +0530

स्थळ : कोरेगाव

( ए.ए.पाचरणे )

दिनांक : १६/०१/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.